Sakal, Pune, April 3, 2012. Pp.1

# शुक्राचं चांदणं आज पडणार

चंद्रकांत यादव : सकाळ वृत्तसेवा

जळगाव, ता. २ : एप्रिल हा जागतिक खगोलशास्त्रीय महिना म्हणून पाळला जातो. निरभ्र आकाश हे या महिन्याचे वैशिष्ट्य. दुधात साखर म्हणजे यंदाचा एप्रिल खगोलीय घडामोडींनी गच्च आहे. महिन्यातील आठ तारखा खगोलीय मेजवानीच्या आहेत. महत्त्वाचे म्हणजे या तारखा वगळता १६ ते २६ एप्रिलदरम्यान 'लिरा' तारकासमूहातून उल्कावर्षावाची खगोलीय दिवाळीही याच महिन्यात आहे !

शुक्राचं चांदणं लेऊन ३ एप्रिलची सायंकाळ येईल. पश्चिम क्षितिजावर शुक्राचे दर्शन घडेलच, त्यासह बाजूलाच सात तारका असलेला इवलासा 'कृत्तिका' हा तारकासमूह दिसेल. पौर्णिमा ६ एप्रिलला आहे आणि ७ एप्रिलला चंद्र हा पृथ्वीच्या अगदी जवळ येणार आहे. चंद्र-पृथ्वी हे अंतर या दिवशी ३५८३६५ किलोमीटर झालेले असेल.

## रात्रभर शनिदर्शन!

आठवड्यानंतर लगेच १५ एप्रिल शनिमहाराज गाजवतील. रात्रभर शनिदर्शन होईल. सूर्य आणि शनी यांच्यामधून पृथ्वीचा प्रवास या दिवशी घडेल. अर्थात, पृथ्वीच्या आकाशात शनी हा सूर्याच्या बरोबर विरुद्ध दिशेला असेल.

पान ७ वर >



## एप्रिलचे औचित्य काय ?

एप्रिलमध्ये आकाश निरभ्र असते. आकाशात खगोलीय घटनांची रेलचेल असते. खगोल अभ्यासकांनी मिळूनच हा महिना 'खगोलशास्त्रीय विशेष मास' ठरवला आहे. जगभरातील खगोल अभ्यासकांनी या महिन्यात आपली दुर्बीण इतरांनाही आकाशदर्शनासाठी उपलब्ध करून द्यायची असते.

Sakal, Pune, April 3, 2012. Pp.1

# शुक्राचं चांदणं आज पडणार

» पान १ वरून

## ाशी २० उल्का

अठरा एप्रिलला बुध हा ग्रह सूर्योदयापूर्वी चंद्रकोरीला लागून दिसेल. तत्पूर्वी, १६ तारखेपासूनच उल्कावर्षावाचा नजारा पाहायला मिळणार आहे. 'लिरा'तून ताशी २० उल्कांचा पाऊस पडेल. बावीस एप्रिलला चंद्र पृथ्वीपासून दूर जाईल. दोघांमधील ंतर ४०६४२० किलोमीटर असेल.

'इतना भी पास मत आओ, कि दूर जाना मुश्कील हो...इतना भी दूर मत जाओ कि पास आना मुश्कील हो', या ओळींप्रमाणे चंद्र आणि पृथ्वीतील अंतराला जणू हा महिना 'एप्रिल फूल' करणार आहे! बावीसलाच गुरू हा चंद्रकोरीच्या अगदी जवळ असेल.

## 'हरिण' होणार आडवे!

तेवीस एप्रिलला सायंकाळी पश्चिमेकडे मृग नक्षत्र आडवे पडलेले दिसेल. एरवी ते उभे दिसते. क्षितिजाला भिडल्यामुळे तेवीसला त्याची ही गत होणार आहे. चंद्र, मंगळ आणि रेग्युलस तारा यांची त्रिकोणाकृती २९ एप्रिलच्या आकाशात दिसेल.